फलज्योतिषातील संशोधनाच्या दिशा

श्री. म.दा.भट यांनी आपल्या प्रास्ताविकात निर्देशिल्याप्रमाणे सदर कुंडली-संग्रह एक हजार कुंडल्यांचा आहे असे वाटते. पाश्चात्त्य देशात ॲलन लिओ, मॉरिस वेमिस् इत्यादी ज्योतिषांनी या आकाराचे काही कुंडली-संग्रह प्रसिध्द केले आहेत. त्यात श्री. म. दा. भटांच्या सदर कुंडली संग्रहाची गणना करावी लागेल. महाराष्ट्रातील सर्व ज्योतिर्विद व ज्योतिष-विषयक अभ्यासू सदर कुंडली-संग्रहाचे स्वागत करून श्री. म. दा. भट यांना धन्यवाद देतील अशी आशा आहे.

या कुंडली-संग्रहात महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या कुंडली मांडण्याच्या पध्द्तीने आणि चित्रापक्षाचे अयनांश लक्षात घेऊन कुंडल्या दिल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीची अभ्यासास आवश्यक व योग्य अशी माहिती दिली आहे. सर्व ग्रहांचे त्या त्या राशीतील भोगलेले पूर्ण अंश दिले आहेत. लग्नाचे अंश मात्र दिले नाहीत, कारण जन्माच्या दिलेल्या स्थळावेळावरून कोणत्याही पंचांगावरून ते सहज काढता येतील. हे खरे असले तरी एवढ्या खटाटोपात लग्नाचे अंशही दिले असते तर ते सोयीचे होऊन संग्रहास स्वयंपूर्णता आली असती, असे वाटते. ग्रहांचे अंश देतानाही एकच पद्धत पाळलेली नाही. ज्या कुंडल्यांचा ठोकळा दिलेला नाही तेथे साहजिकच प्रत्येक ग्रहाची राशी व भुक्त अंश दिलेले आहेत. परंतु ज्या कुंडल्यांचा ठोकळा दिलेला आहे त्यांच्या ग्रहांचे अंश देताना राशींचा उल्लेख केलेला नाही. त्याकरता एक-दोन पाने उलटून ठोकळा पाहिला पाहिजे. त्यामुळे काटकसरीच्या मानाने गैरसोय होते. म्हणून ग्रहांचे अंश देताना सर्व कुंडल्यांकरता एकच पद्धत अवलंबिली असती तर बरे झाले असते असे वाटते. (नविन आवृत्तीत हे सुधारलेले आहे.)

छपाईचा वाढता खर्च आणि सर्वसामान्य ज्योतिषविषयक अभ्यासकांची आर्थिक परिस्थिती यांचा विचार करता छपाईत शक्यतो काटकसर करणे अर्थातच आवश्यक आहे. त्या दृष्टीने कुंडल्यांचे ठोकळे अभ्यासकात उपयुक्त असले तरी फार खर्चाचे ठरतात. त्या ऐवजी प्रत्येक कुंडलींचे लग्न व ग्रहांचे अंश एका ओळींत मांडून सर्व कुंडल्या एकाखाली एक मांडल्या तर छपाईच्या खर्चात पुष्कळच बचत होईल. पाश्चात्त्य देशात प्रसिद्ध झालेल्या कुंडली संग्रहात साधारणपणे अशीच मांडणीची पद्धत आहे. ही पद्धत स्वीकारली तर एका भागात कुंडल्या व दुसऱ्या भागात प्रत्येक व्यक्तीची कुंडलीचे दृष्टीने आवश्यक व उपयुक्त माहिती असे संग्रहाचे

स्वरूप राहील. अशाने छपाईचा खर्च खूपच कमी होईल.

या तपशीलात एवढ्या विस्ताराने जाण्याचे कारण एवढेच की श्री. भटांनी सुरू केलेला कुंडली-संग्रहाचा हा उपक्रम येथेच न थांबता याच प्रकाराचे अनेक कुंडली-संग्रह प्रकाशित व्हावयाचे तर त्यांची मांडणी छपाईच्या खर्चाच्या दृष्टीने काटकसरीची आणि अभ्यासक्रमाच्या सोईची असावयास हवी. असो.

या वा अशाच प्रकारच्या कुंडली-संग्रहांचा उपयोग अभ्यासकांनी कसा करावा याचेही विवेचन श्री. भटांनी केले आहे. त्यांनी विशद केल्याप्रमाणे जातक शास्त्रानुसार कुंडलीतील ग्रह चार प्रकारची फले देतात. एखादा ग्रह कोणत्या राशीत वा नक्षत्रात आहे, तो कोणत्या स्थानात वा भावात आहे, कोणत्या स्थानाचा वा भावाचा तो अधिपती आहे आणि कुंडलीत इतर ग्रहांशी तो कोणते योग करतो यावर ही चार प्रकारची फलिते अवलंबून असतात. एखाद्या व्यक्तीची जन्मतारीख माहीत असली परंतु जन्मवेळ माहीत नसली तरी चंद्राखेरीज करून बाकी ग्रहांच्या राशी व नक्षत्रे व त्यावरून ग्रहांमधील परस्पर योग पक्के होतात. त्यामुळे नुसत्या जन्मतारखेवरूनही, जर त्या व्यक्तीची जीवनाविषयी पुरेशी माहिती असली तर, ग्रहांची राशी व नक्षत्रगत फले, तसेच त्यामधील परस्पर योगांची फलिते यांचा अभ्यास करता येतो. हे जरी खरे असले तरी हेही लक्षात ठेवावयास हवे की ग्रहांची राशी वा नक्षत्रगत बरीवाईट फले तसेच त्यामधील परस्पर योगांची बरीवाईट फले ही व्यक्तीच्या जीवनाच्या या ना त्या कोणत्या तरी विशिष्ट अंगाशी निगडित असतात आणि एखादा ग्रह व्यक्तीच्या जीवनाच्या कोणत्या अंगाशी निगडित आहे हें तो त्या कुंडलीत कोणत्या भावांचा अधिपती आहे आणि कोणत्या भावात पडला आहे यावर अवलंबून असते. याकरता कुंडलीचे लग्नांश आणि त्याकरता जन्मवेळ माहीत असावी लागते, तात्पर्य, ग्रहांच्या नानाविध फलांचा अभ्यास करावयाचा तर अभ्यासकाजवळ लग्नांशासहित अनेक कुंडल्यांचा संग्रह असावयास हवा. अशा तऱ्हेच्या जवळ जवळ एक सहस्र कुंडल्या प्रस्तुत कुंडली-संग्रहात समाविष्ट असल्याने अभ्यासकास तो फार उपयुक्त ठरणार आहे.

एखाद्या कुंडलीचे लग्नांश माहीत असले म्हणजे त्या कुंडलीत कोणते ग्रह कोणत्या भावांचे अधिपती आहे हे निश्चित होते आणि ते कोणत्या राशीत वा नक्षत्रात आहेत ते पाहिले म्हणजे ते कोणत्या भावात आहेत हेही निश्चित होते. म्हणून उपलब्ध कुंडल्यांचे त्यांच्या लग्नानुसार निदान बारा विभागात प्राथमिक वर्गीकरण करणे अगत्याचे ठरते. श्री. भटांनी सुचविल्याप्रमाणे एकेका लग्नाच्या निदान पन्नास कुंडल्या अभ्यासकाने अभ्यासावयास हव्यात. म्हणजेच सर्व लग्नांच्या मिळून निदान सहाशे कुंडल्यांच्या संग्रह अभ्यासकाजवळ असावयास हवा. प्रस्तुत कुंडली-संग्रहात अशा तऱ्हेच्या प्रत्येक लग्नाच्या सुमारे पन्नास कुंडल्या अभ्यासकास उपलब्ध होतील अशी आशा आहे.

प्रत्येक लग्नाच्या पन्नास अशा सर्व लग्नांच्या मिळून सहाशे कुंडल्यांचा संग्रह हा फार मोठा वाटला तरी अभ्यासाच्या दृष्टीने तो किती तुटपुंजा आणि म्हणून किती अत्यावश्यक आहे हे लक्षात घ्यावयास हवे. अमुक एका लग्नाच्या कुंडलीत एखाद्या ग्रहाची राशी वा भावानुरूप कोणती फले मिळतात याचा अभ्यास करावयाचा तर आपल्या संग्रहात तो ग्रह बाराही राशींत वा भावात असल्याची उदाहरणे असावयास हवीत. एका लग्नाच्या फक्त पन्नासच कुंडल्या आपल्यापाशी असल्या तरी सरासरीने एखादा ग्रह अमुक एका राशीत वा भावात असल्याची फक्त चार पाचच उदाहरणे आपल्या संग्रहात असणार. शनिसारखा मंदगती ग्रह सर्व राशीत वा भावात असणारी उदाहरणे जमविण्याकरता आपल्या संग्रहातील कुंडल्या जन्मतारखेनुसार तीस चाळीस वर्षांवर विभागलेल्या असावयास हव्या. शनीपेक्षाही अधिक मंदगतीचे ग्रह म्हणजे हर्षल, नेपच्यून आणि प्लूटो हे सर्व राशीत वा भावात असल्याची उदाहरणे जमविणे म्हणजे अर्थातच अवघड वा अशक्यच.

हे झाले एकेका ग्रहाच्या राशी वा भावानुरूप फलिताच्या अभ्यासचे. दोन वा अधिक ग्रह कुंडलीतील विविध राशीत वा भावात विविध योगात असण्याची उदाहरणे गोळा करावयाची तर कुंडली-संग्रह अनेक पटींनी मोठा असावयास हवा हे सारे विस्ताराने सांगण्याचे कारण एवढेच की हजार बाराशे कुंडल्यांचा संग्रह मोठा वाटला तरी जातकशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने तो किती तुटपुंजा पडतो हे लक्षात यावे. प्रस्तुतचा कुंडली - संग्रह स्वागतार्ह आहे याचे कारण या दिशेने टाकलेले हे पहिले महत्त्वाचे पाऊल आहे.

गणिताच्या पुस्तकात एखादे प्रमेय समजावून दिल्यानंतर त्या प्रमेयावर आधारलेली अनेक उदाहरणे दिलेली असतात. ही उदाहरणे सोडविली म्हणजे प्रमेय मनात पक्के ठसते. जातकशास्त्राच्या अभ्यासकास कुंडली-संग्रहाचा असाच उपयोग आहे. जातकाचे नियम व आडाखे समजावून घेतल्यानंतर विशिष्ट नियम वा आडाख्यांची उदाहरणे अभ्यासकाने कुंडली संग्रहातून शोधून काढावीत म्हणजे ते नियम वा आडाखे मनात पक्के होतील. श्री. भटांनी, कुंडली-संग्रह-एक अभ्यास या प्रकरणात याविषयी दिग्दर्शन केले आहे. उदाहरणार्थ, पंचमेश पंचमात असता मनुष्य, बुद्धिवान, शिक्षक, लेखक, उपासक असतो. याची उदाहरणे म्हणून स्वामी स्वरूपानंद, स्वामी विवेकानंद, श्रीधर स्वामी, स्वा. सावरकर, न्या. रानडे, न्या. तेलंग, वि. का. राजवाडे यांचा उल्लेख केला आहे. नवमेश नवमात असता मनुष्य धर्मशास्त्र प्रवीण, संप्रदाय काढणारा, तत्त्वज्ञ, लोकमान्य, भाग्यवान् असतो. याची उदाहरणे म्हणून महर्षि अण्णासाहेब पटवर्धन, नारायण महाराज केडगांवकर, विनोबा भावे, लोकमान्य टिळक, राधाकृष्णन्, रँ. परांजपे यांचा उल्लेख केला आहे. दशमेश दशमात असता मनुष्य कर्तुत्ववान असून आपल्याला क्षेत्रात नावलौकिक व लोकमान्यता मिळवतो. त्याची उदाहरणे म्हणून गोंदवलेकर महाराज, नारायण महाराज केडगांवकर,

गुरूदेव रानडे, विनोबा भावे, आगरकर, शंकरराव किर्लोस्कर, गडकरी, बालकवी, कुमार गंधर्व, शिल्पकार करमरकर, महात्मा गांधी, लता शिलेदार, लालबहादूर शास्त्री, आबासाहेब गरवारे, जे. आर. टाटा यांचा उल्लेख केला आहे. भावेशांच्या फलाप्रमाणेच विशिष्ट भावातील विशिष्ट ग्रह उदाहरणार्थ सप्तमातील व दशमातील मंगळ यांची उदाहरणे दिली आहेत. विशिष्ट राशीतील विशिष्ट ग्रह उदाहरणार्थ, उच्च वा स्वगृहीचा शुक्र आणि मंगळ यांची उदाहरणे दिली आहेत. त्याचप्रमाणे, अनेक प्रथम दर्जांच्या ग्रहयोगांचीही उदाहरणे दिली आहेत. साहजिकच योगानुसार जेथे फले मिळाली आहेत तेवढ्या कुंडल्यांचाच फक्त निर्देश केला आहे.

या कुंडली-संग्रहात एक सहस्त्र कुंडल्या दिल्या आहेत. पूर्वी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक कुंडलीतील ग्रहांचे अंश, प्रमुख ग्रहयोग व जातकशास्त्राचे दृष्टीने व्यक्तीची महत्त्वाची माहिती दिली आहे. त्याचबरोबर प्रत्येक कुंडलीतील कोणत्या योगान्वये कुंडलीचा अर्थ लागतो वा कुंडली सुटते याचा निर्देश केला असता तर बरे झाले असते. असा निर्देश काही कुंडल्यांचे बाबतील केला आहे. परंतु सर्व कुंडल्यांबाबत केलेला दिसत नाही.. ज्या कुंडल्याबाबत असा निर्देश नाही त्या कुंडल्या जातकशास्त्राच्या कोणत्याच नियमाने वा आडाख्याने सुटत नाहीत असे समजावयाचे का याचा खुलासा करावयास हवा होता. अशा रीतीने प्रत्येक कुंडलीबाबत ती कोणत्या नियमाने वा नियमांनी सुटते किंवा कोणत्याच नियमाने सुटत नाही ते स्पष्ट केले असते तर अभ्यासकांस उपयुक्त ठरले असते.

जातकशास्त्राच्या विविध ग्रंथात दिलेले नियम वा आडाख्यांचा अभ्यास करून अनेक कुंडल्यांच्या निरीक्षण-अभ्यासाने ते नियम वा आडाखे मनात पक्के करावयाचे असे जातकशास्त्राच्या अभ्यासाचे स्वरूप आहे. भारतात तसेच महाराष्ट्रात जातकशास्त्राचे अनेक अभ्यासक आहेत. त्यापैकी काही यशस्वी व्यावसायिकही आहेत. परंतु जातकास शास्त्र, म्हणावयाचे किंवा शास्त्राप्रत न्यावयाचे तर याविषयी काही अभ्यासकांनी संशोधन करावयास हवे. **संशोधन म्हणजे चिकित्सक अभ्यास. भारतीय बुद्धिजीवनावर गुरूमुख आणि ग्रंथप्रामाण्याचा पगडा असल्याने संशोधनाची म्हणजे चिकित्सक अभ्यासाची परंपरा एकूणच दुर्बल आहे.** संशोधक वा चिकित्सक अभ्यास म्हटला म्हणजे अभ्यास करतांना अभ्यासकांस शंका आली पाहिजे. त्याने प्रश्न विचारला पाहिजे, परंतु **शंका घेतली, प्रश्न विचारला म्हणजे गुरूचा व ग्रंथाचा अवमान होतो, अहंकार वाढीस लागतो व ज्ञानसाधनेत व्यत्यय येतो असे आम्ही मानतो.** त्यामुळे आमच्याकडे **संशोधक प्रवृत्तीची जोपासना ऐकूणच जशी व्हावी तशी होत नाही.** जातकशास्त्राच्या अभ्यासकात व व्यावसायिकात तर या प्रवृत्तीचा प्रायः पूर्ण अभावच आहे. प्रस्तुतचा कुंडली-संग्रह या दृष्टीने पहिले महत्त्वाचे पाऊल आहे. म्हणून या कुंडली-संग्रहाचे निमित्ताने जातकशास्त्रात कोंणत्या दिशेने व पद्धतीने संशोधन व्हावयास हवे याचे थोडेसे विवेचन अप्रस्तुत होणार नाही अशी आशा

आहे.

वर म्हटल्याप्रमाणे प्रस्थापित शास्त्रासंबंधी शंका व प्रश्न येथून संशोधनास सुरुवात होते. उदाहरणार्थ, भावेशांची फले पाहू. पंचमेश पंचमात असेल तर मनुष्य बुद्धिवान, शिक्षक, लेखक वा उपासक असतो. नवमेश नवमात असता मनुष्य धर्मशास्त्रप्रवीण, संप्रदाय काढणारा, तत्त्वज्ञ, लोकमान्य, भाग्यवान असतो. दशमेश दशमात असता मनुष्य कर्तृत्ववान असून आपापल्या क्षेत्रात नांवलौकिक व लोकमान्यता मिळवितो. आता प्रश्न असा की या तीन फलितात काही फरक आहे की नाही? आणि फरक असलाच तर तो या तींन फलितांची जी उदाहरणे दिली आहेत त्यात दिसतो कां? स्वामी स्वरूपानंद, सावरकर आणि न्या. रानडे या तिघांचा पंचमेश पंचमात आहे. पण ह्या तिघांची गणना एकाच प्रकारात करावयाची का? नारायण महाराज केडगांवकर, लोकमान्य टिळक आणि रँ. परांजपे या तिघांचा नवमेश नवमात आहे. परंतु ह्या तिघांची गणना एकाच प्रकारात करावयाची का? गुरूदेव रानडे, आगरकर आणि आबासाहेब गरवारे या तिघांचा दशमेश दशमात आहे. पण या तिघांची गणना एकाच प्रकारात करावयाची का? उलट, स्वामी स्वरूपानंद, नारायण महाराज केडगांवकर आणि गुरूदेव रानडे यांतील साम्य भावेशांच्या स्थितीवरून का दिसत नाही? सावरकर, टिळक आणि आगरकर यांतील साम्य भावेशांच्या स्थितीवरून का दिसत नाही? का पंचमेश पंचमात, नवमेश नवमात, दशमेश यांपैकी काही असले तर सामान्यपणे माणूस मोठा असतो एवढेच समजावयाचे?

दुसरे असे की या कुंडलीसंग्रहात अनेक मोठी, लोकमान्य माणसे आहेत. त्यांचे पंचमेश पंचमात नाहीत, नवमेश नवमात नाहीत, किंवा दशमेश दशमात नाहीत. त्यांचे काय? ती कोणत्या योगामुळे मोठी झाली? उलट, अशा अनेक कुंडल्या आहेत की त्यांचा पंचमेश पंचमात, नवमेश नवमात किंवा दशमेश दशमात आहे आणि तरीही ती माणसे कोणत्याही अर्थाने मोठी अथवा भाग्यवान नाहीत. प्रस्तुत कुंडली-संग्रहातही अशी उदाहरणे सापडतील. सरासरीने सांगावयाचे तर दर बारा कुंडल्यांपैकी एका कुंडलीत पंचमेश पंचमात, एका कुंडलीत नवमेश नवमात आणि एका कुंडलीत दशमेश दशमात असणार. म्हणजे सरासरीने बारांपैकी तीन कुंडल्यात पंचमेश, नवमेश किंवा दशमेश स्वगृहीचा असणार. मग बारांपैकी तीन म्हणजे चारपैकी एक मनुष्य कोणत्या ना कोणत्या अर्थाने मोठा, कर्तबगार, लोकमान्यता पावलेला भाग्यवान असतो असे म्हणावयाचे का?

तात्पर्य, जातकशास्त्राचे नियम अनुभवसिद्ध आहेत असे म्हटले तर त्यांचा पडताळा कोणत्या रीतीने पहाणे शक्य आहे ते प्रथम स्पष्ट केले पाहिजे. उदाहरणार्थ, पंचमेश पंचमात असता मनुष्य बुद्धिमान्, शिक्षक, लेखक, वा उपासक असतो हा नियम घेऊ. या नियमाचा अर्थ असा करावयाचा का की **पंचमेश पंचमात असणारा प्रत्येक मनुष्य बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक असलाच पाहिजे** आणि पंचमेश पंचमात नसला तर मनुष्य या सदरात बसताच कामा नये?

जातकशास्त्राच्या नियमांचा असा अर्थ केला तर कोणताही नियम सिद्ध करणे फार अवघड नाही. उदाहरणार्थ, पंचमेश पंचमात असूनही एखादा मनुष्य बुद्धिवान, शिक्षक, लेखक वा उपासक नाही किंवा पंचमेश पंचमात नसताही एखादा मनुष्य या सदरात बसतो असे दाखविले तर हा नियम असिद्ध ठरेल. परंतु जातकशास्त्राच्या नियमांचा असा एकांतिक अर्थ लावण्याचे कारण नाही. जातकशास्त्राचे नियम अगदी गणिताच्या नियमांसारखेच असावयास हवेत असे नाही. मग जातकशास्त्राच्या नियमांचा अर्थ कसा करावयाचा? पंचमेश पंचमात असता काय होईल असे म्हणावयाचे? याविषयी विचार करता असे दिसते की पंचमेश पंचमात असता मनुष्य बुद्धिवान, शिक्षक, लेखक वा उपासक असतो असे म्हटले तरी त्याचा अर्थ एवढाच मानावयाचा की पंचमेश पंचमात असला तर मनुष्य असा असा असण्याचा संभव असतो. म्हणजे तरी काय? म्हणजे असे की पंचमेश पंचमात असला तर प्रत्येक मनुष्य उपरोक्त प्रकारचा असलाच पाहिजे असे नाही. किंवा पंचमेश पंचमात नसला तर मनुष्य या प्रकारचा असलाच पाहिजे असे नाही. किंवा पंचमेश पंचमात असला तर मनुष्य, बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक असण्याचा अधिक संभव असतो एवढेच.

या मर्यादित अर्थाने तरी जातकशास्त्राच्या नियमांचा पडताळा येतो का, त्याकरता काही शास्त्रशुद्ध पुरावा दाखविता येतो का हे पाहणे हे एतद्विषयक संशोधनांतील पहिले पाऊल आहे. त्याकरिता नियमानुसार ज्यांना फले मिळाली आहेत तेवढ्याच कुंडल्या बघून चालणार नाही. नियमानुसार ज्यांना फले मिळाली नाहीत आणि योग नसतानाही ज्यांना त्या योगची फले मिळाली आहेत अशा कुंडल्याही पाहिल्या पाहिजेत. सारांश, ज्या नियमांविषयी संशोधन करावयाचे त्या नियमास अनुकूल कुंडल्याच फक्त पाहून चालणार नाही तर अभ्यासास उपलब्ध असलेल्या सर्व कुंडल्या पाहून त्यापैकी नियमास अनुकूल किती व प्रतिकूल किती ते पाहिले पाहिजे. उदाहरणार्थ, पंचमातील पंचमेशाचा नियम घेऊ. हा नियम लक्षात घेऊन अभ्यासास उपलब्ध असलेल्या सर्व कुंडल्यांचे प्रथम दोन गटात वर्गीकरण करावयास हवे. एक ज्यांचा पंचमेश पंचमात आहे आणि दुसरा ज्यांचा पंचमेश पंचमात नाही. या नंतर या प्रत्येक गटातील कुंडल्यांचे दोन उपगटात वर्गीकरण करावयास हवे. एक ज्यांची गणना बुद्धिमान, शिक्षक, लेखक, उपासक या सदरात करता येईल आणि दुसरा ज्यांची अशी गणना होत नाही. अशा रीतीने अभ्यासास उपलब्ध असलेल्या सर्व कुंडल्यांचे, उदाहरणार्थ प्रस्तुत कुंडली-संग्रहातील सर्व हजार कुंडल्यांचे, चार गटात वर्गीकरण होईल :- (१) ज्यांचा पंचमेश पंचमात आहे आणि ज्यांची गणना बुद्धिमान, शिक्षक, लेखक, उपासक या प्रकारात होते, (२) ज्यांचा पंचमेश पंचमात आहे पण ज्यांची गणना वरील प्रकारात होत नाही, (३) ज्यांचा पंचमेश पंचमात नाही, परंतु ज्यांची गणना वरील प्रकारात होते, आणि (४) ज्यांचा पंचमेश पंचमात नाही आणि ज्यांची गणना वरील प्रकारात होत नाही.

एवढो सिद्धता झाली की या नियमात प्रथम दर्शनी तरी काही तथ्य आहे की नाही ते पाहता येते. त्याकरता पंचमेश पंचमात असलेल्या ज्या कुंडल्या आहेत त्यांपैकी किती कुंडल्यात फलित मिळाले आहे आणि किती कुंडल्यात फलित मिळाले नाही ते पहावे. म्हणजेच पंचमेश पंचमात असलेल्या कुंडल्यात कितींची गणना बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक या सदरात होते ते पहावे. त्यांची टक्केवारी काढावी. उदाहरणार्थ, असे समजू, पंचमेश पंचमात असलेल्या कुंडल्यांपैकी साठ टक्के कुंडल्यांची गणना या सदरात होते आणि बाकीच्या चाळीस टक्के कुंडल्यात पंचमेश पंचमात असूनही त्या या सदरात पडत नाहीत. आता ज्या कुंडल्यात पंचमेश पंचमात नाही त्यांच्याकडे वळू. त्यांपैकी काही कुंडल्या बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक या सदरात असतील. त्यांची टक्केवारी काय ते काढावे. समजा, अशा कुंडल्यांपैकी वीस टक्के कुंडल्या या प्रकारात मोडतात. म्हणजे ज्यांच्या पंचमेश पंचमात नाही अशा व्यक्तींपैकी सुद्धा वीस टक्के व्यक्ती बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक आहेत.

सारांश, आपण असे समजू की आपल्या कुंडली-संग्रहापैकी ज्या कुंडल्यात पंचमेश पंचमात आहे त्यांपैकी साठ टक्के व्यक्ती आणि ज्या कुंडल्यात पंचमेश पंचमात नाही त्यांपैकी वीस टक्के व्यक्ती बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक या सदरात मोडतात. यावरून पंचमेश पंचमात असला तर व्यक्ती उपरोक्त प्रकारची असण्याचा अधिक संभव असतो हा जो जातकशास्त्राचा नियम, त्यात काही तथ्य आहे असे प्रथमदर्शनी तरी सिद्ध होते. प्रथमदर्शनी म्हणण्याचे कारण एवढेच की ज्यामानाने कुंडली-संग्रह मोठा त्यामानाने वरील प्रकारचा पुरावा अधिक प्रबळ मानावयास हवा. हजार दोन हजार कुंडल्यांच्या अभ्यासातून निघालेला निष्कर्ष हा पाचपन्नास कुंडल्यांच्या अभ्यासातून निघालेल्या निष्कर्षापेक्षा अधिक विश्वासार्ह. म्हणून कोणी हजार कुंडल्यांचा अभ्यास केला तरी त्याचे निष्कर्ष अंतिम व अबाधित होत नाहीत. त्यानंतर कोणी दहा हजार कुंडल्या अभ्यासल्या तर त्याचे निष्कर्ष काय ते पाहिलेच पाहिजे. कोणत्याही शास्त्राचे नियम सिद्ध होतात ते याच अर्थाने.

परंतु आता असे समजू की वर वर्णन केलेल्या अभ्यासात असे दिसले की ज्यांचा पंचमेश पंचमात आहे त्यापैकी ज्याप्रमाणे साठ टक्के कुंडल्या बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक दिसतात त्याचप्रमाणे ज्यांचा पंचमेश पंचमात नाही, त्यांपैकीसुद्धा साठटक्के कुंडल्या वरील प्रकारात बसतात. याचा अर्थ असा की पंचमेश पंचमात आहे, म्हणून काही फरक होतो, म्हणून बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक असण्याचा अधिक संभव असतो असे दिसत नाही. तात्पर्य. जातक शास्त्रातील पंचमेशाच्या फलिताला पुरावा मिळत नाही. म्हणून निदान प्रथमदर्शनी तरी त्यात तथ्य नाही असे म्हणावे लागेल.

अशा रीतीने जातकशास्त्राच्या काही नियमात प्रथमदर्शनीच तथ्य दिसत नसले तर आणखी

कुंडल्या गोळा करून त्याबाबत अनुकूल पुरावा उपलब्ध होतो का हे पहाण्याखेरीज गत्यंतर नाही. परंतु वर निर्देशिलेल्या पद्धतीने जातकशास्त्राच्या एखाद्या नियमात प्रथमदर्शनी तरी तथ्य दिसण्या इतका पुरावा उपलब्ध असला तर संशोधनाचे पुढले पाऊल टाकता येईल. ते विशद करण्यापूर्वी या पद्धतीने संशोधन करताना एक महत्त्वाची खबरदारी घ्यावी लागते तिचा विचार करू.

पंचमातील पंचमेशाच्या फलिताचे उदाहरण घेऊन वर असे सांगितले की उपलब्ध कुंडल्यांचे दोन पद्धतीने वर्गीकरण करावे. एक कुंडलीत पंचमेश पंचमात आहे किंवा नाही त्यानुसार आणि दुसरे व्यक्ती बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक आहे किंवा नाही त्यानुसार. पहिल्या वर्गीकरणात अडचण नाही, कारण पंचमेश पंचमात आहे किंवा नाही यासंबंधी दुमत असण्याचे कारण नाही. परंतु यांतही एक श्लेष आहे तो जाता जाता नमूद करतो. काही ज्योतिषी केवळ ठोकळ कुंडली बघतात म्हणजे-लग्नाची केवळ राशी लक्षात घेऊन कुंडलीच्या बारा स्थानात बारा राशी मांडतात आणि त्यानुसार विविध भावांचे अधिपती जसे पंचमेश कोण ते ठरवितात. या प्रकारे ठरलेला पंचमेश पंचमात मांडलेल्या राशीत असला तर तो पंचमात आहे असेही मानतात. परंतु लग्नाचे अंश लक्षात घेऊन कुंडली भावचलित केली तर पंचमेश केवळ त्या राशीत आहे एवढ्याने तो पंचमात आहे असे होत नाही. उलट, कुंडली भावचलित केली तर एका भावात बहुधा दोन राशी अंशतः आलेल्या असतात. अशा वेळी एखाद्या स्थानाचा अधिपती कोण याविषयी मतभेद होऊ शकतो, याविषयी विवेचन येथे प्रस्तुत नाही. येथे मुद्दा एवढाच की पंचमेश पंचमात आहे किंवा नाही यासंबंधी दुमत असून चालणार नाही. त्यासंबंधीची व्याख्या कुंडल्यांचे वर्गीकरण सुरू करण्यापूर्वीच निश्चित केली पाहिजे. आणि सर्व कुंडल्यांना ती सारखीच लागू केली पाहिजे. एका कुंडलीला एक व्याख्या तर दुसऱ्या कुंडलीला दुसरी व्याख्या असे करून चालणार नाही.

दुसरे वर्गीकरण करावयाचे ते फलितानुसार. याबाबत तर विशेषच काळजी घ्यावी लागते. बुद्धिवान, कर्तृत्ववान, भाग्यवान, इत्यादी गुणांनुसार वर्गीकरण करणे हे अवघड काम आहे. शिक्षक, लेखक, उपासक हेही ठरविणे वरकरणी वाटते तेवढे सोपे नसते. याविषयी कटाक्षाने काळजी घ्यावयाची ती अशी की कोणती व्यक्ति बुद्धिमान आहे, लेखक आहे, उपासक आहे हे स्वतंत्रपणे, तिची कुंडली न बघता ठरविले पाहिजे आणि तसे लिहून ठेवले पाहिजे. हे न करता वर्गीकरण करताना कुंडली पाहून व्यक्ती बुद्धिमान आहे किंवा नाही, लेखक आहे किंवा नाही, उपासक आहे किंवा नाही याविषयी संशोधक निर्णय करू लागला तर जातकशास्त्राविषयीचा त्याचा पूर्वग्रह वर्गीकरणात शिरण्याचा धोका असतो. संशोधकास जातकशास्त्रात तथ्य वाटत असले तर कळत नकळत वर्गीकरण त्या साईने होऊ लागते. संशोधनाचे निर्णय आपल्या पूर्वग्रहाने दूषित होणार नाहीत याविषयी संशोधकाने सदैव जागरूक व दक्ष रहावे लागते. म्हणूनच कुंडलीविषयी व्यक्तींचे लौकिक गुणावगुण त्यांची कुंडली न पाहता स्वतंत्रपणे निश्चित करून

त्यानुसारच पुढील वर्गीकरण करावयास हवे.

आता मूळ प्रश्नाकडे वळू. वर म्हटल्याप्रमाणे असे समजू की आपल्या कुंडली-संग्रहात ज्यांचा पंचमेश पंचमात आहे त्यांपैकी साठ टक्के व्यक्ती बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक या सदरात मोडतात. उलट, ज्यांचा पंचमेश पंचमात नाही त्यांपैकी फक्त वीस टक्के व्यक्तीच वरील प्रकारात मोडतात. यावरून, पंचमेश पंचमात असला तर मनुष्य बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक असण्याचा अधिक संभव असतो वा जातकाच्या नियमात प्रथमदर्शनी तरी तथ्य आहे असे होईल. परंतु संशोधन येथे थांबत नाही. संशोधकाने असा प्रश्न उपस्थित केला पाहिजे की पंचमेश पंचमात असूनही ज्या व्यक्ती बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक नाहीत त्या तशा का नाहीत. त्यांच्या कुंडलीत असे कोणते योग आहेत की ज्यामुळे पंचमांतील पंचमेशाची फले त्यांना मिळत नाहीत. याविषयी जातकशास्त्रात जे नियम असतील ते त्याने विचारात घेतले पाहिजेत. त्याने दुसराही प्रश्न उपस्थित केला पाहिजे की पंचमेश पंचमात नसतानाही ज्या व्यक्ती बुद्धिमान, शिक्षक, लेखक वा उपासक आहेत त्या तशा का आहेत. त्यांच्या कुंडलीत असे कोणते योग आहेत की जे पंचमांतील पंचमेशाची फले देतात. याविषयी जातकशास्त्रांचे नियम असतील तेही त्याने विचारात घेतले पाहिजेत. असे सर्व नियम लक्षात घेऊन त्याला आता एक नवीन नियम तयार करता येईल.

पूर्वीच्या केवळ पंचमेश पंचमात असणे या नियमापेक्षा हा नवीन नियम बराच गुंतागुंतीचा होईल. त्याने बिघडत नाही. परंतु हा गुंतागुंतीचा नियम पहिल्या साध्या नियमापेक्षा प्रत्यक्षात अधिक प्रमाणात उतरतो का ते पहावयास हवे. त्याकरिता वर दिलेली पद्धतच पुनश्च वापरावी लागेल. नियमात दिलेले योग ज्या कुंडल्यात आहेत आणि ज्या कुंडल्यात नाहीत अशा दोन गटांमध्ये सर्व उपलब्ध कुंडल्यांचे वर्गीकरण करावे. नंतर ज्या कुंडल्यात नियमांतील योग आहेत त्यापैकी किती कुंडल्यात नियमांतील फलिते दिसतात आणि किती कुंडल्यात अशी फलिते दिसत नाहीत ते काढावे. त्याचप्रमाणे ज्या कुंडल्यात नियमांतील योग नाहीत अशांपैकी किती कुंडल्यात योग नसताही फलिते दिसतात आणि किती कुंडल्यात फलिते दिसत नाहीत ते काढावे. एवढे केले म्हणजे सर्व कुंडल्यांचे योग आहे-नाही, फलित मिळाले-मिळाले नाही यानुसार चार गटात करावयाचे वर्गीकरण पूर्ण होते.

हा नवीन गुंतागुंतीचा नियम पूर्वीच्या सोप्या नियमापेक्षा अधिक ग्राह्य आहे की नाही हे कसे ठरवावे? याविषयीचे तत्त्व साधे आहे. सोप्या नियमाने किती कुंडल्या सुटतात ते पहावे आणि गुंतागुंतीच्या नियमाने किती सुटतात ते पहावे. नियमांतील योग आहेत आणि फलित मिळाले आहे किंवा नियमांतील योग नाहीत आणि फलित मिळाले नाही असे असले की त्या नियमाने कुंडली सुटली असे म्हणावयाचे. उलटपक्षी, नियमांतील योग असूनही फलित मिळाले नाही किंवा

नियमांतील योग असूनही फलित मिळाले आहे असे असणे म्हणजे त्या नियमाने कुंडली सुटली नाही असे म्हणावयाचे. सोप्या नियमापेक्षा गुंतागुंतीच्या नियमाने अधिक कुंडल्या या अर्थाने सुटत असल्या तरच गुंतागुंतीचा नियम ग्राह्य मानावा. नाहीतर सोपा नियम हा सोपा म्हणून अधिक ग्राह्य मानावा.

शास्त्रीय संशोधनाचे असे स्वरूप आहे आणि त्यातूनच शास्त्र प्रगत होत असते. सर्व अनुभवजन्य शास्त्रास हे लागू आहे. जातकशास्त्रास शास्त्र म्हणावयाचे किंवा शास्त्राप्रत न्यावयाचे तर याच मार्गाने संशोधन करावे लागेल. जातकशास्त्रात असंख्य योग दिलेले आहेत. त्यांचे एकत्रित अवलोकन करून प्रत्येक नियम वरीलप्रमाणे शास्त्रीय निकषावर घासून पाहणे आजपावेतो दुरापास्त होते. परंतु आता आधुनिक कॉम्प्युटर किंवा गणकयंत्राने हे काम अत्यंत सुलभ झाले आहे. जातकशास्त्रातील सर्व योग व नियम पाहिले तरी त्यांची संख्या दोनचार हजारांचे पुढे जाणार नाही. हे सर्व योग गणकयंत्राच्या स्मरणशक्तीत बसविता येणे शक्य आहे. हे केले म्हणजे यातील प्रत्येक योग वा नियम स्वतंत्रपणे किंवा त्यापैकी कितीही योग वा नियम एकसमयावच्छेदे विचारात घेऊन कोणत्या कुंडल्यात हे योग आहेत, ते कोणत्या कुंडल्यात ते नाहीत आणि कोणत्या कुंडल्यात तत्संबंधीची फलिते मिळाली आहेत, कोणत्या कुंडल्यात ती मिळालेली नाहीत यानुसार हजारो कुंडल्यांचे वर्गीकरण गणकयंत्र अक्षरशः एकदोन मिनिटांचे अवधीत करू शकते. तात्पर्य, उपनिर्दिष्ट मार्गाने जातकशास्त्रात संशोधन करणे आता सहज शक्य झाले आहे. आज गरज आहे ती कुंडली-संग्रहाची, जन्मस्थळ, जन्मतारीख आणि स्थूलमानाने का होईना जन्मवेळ, तसेच संबंधीत व्यक्तीच्या जीवनांतील विविध अंगांविषयी जातकशास्त्राविषयींचे पूर्वग्रह बाजूस ठेवून नमूद केलेली विश्वासार्ह माहिती इत्यादींनी युक्त अशा हजारो कुंडल्यांच्या संग्रहाची संशोधनास गरज आहे. महाराष्ट्रात आज शेकडो व्यावसायिक फलज्योतिषी आहेत. हजारो अभ्यासक आहेत आणि असंख्य लोकांना या शास्त्राविषयी कुतूहल आहे. त्या सर्वांनी सहकार्य दिले तर असा समृध्द कुंडली-संग्रह उभारणे अवघड नाही.

आज समाजात जातकशास्त्राकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन आहेत, दुर्दैवाने हे दोनही दृष्टिकोन या शास्त्रात शास्त्रशुद्ध संशोधन करण्यास पोषक नाहीत. पहिला पक्ष स्वतःस बुद्धिवादी म्हणविणाऱ्यांचा. त्यांच्या मते फलज्योतिष हे थोतांड आहे. खगोलातील ग्रहांचा मानवी दैनंदिन जीवनावर परिणाम कोणत्या प्रकारने, कोणत्या मार्गाने होऊ शकेल याला आज कोणत्याही भौतिकशास्त्राचा आधार नाही. मग यात शास्त्रशुद्ध संशोधनाची गरज काय? जातकशास्त्राला आज भौतिक शास्त्रांचा आधार नाही हे खरे आहे. जातकशास्त्राच्या काही समर्थकांना हे कळत नाही. ते म्हणतात चंद्राच्या गुरुत्वाकर्षणाने पृथ्वीवर सागरास भरती, ओहोटी येते ना त्याच तऱ्हेने ग्रहनक्षत्रांचे मानवी जीवनावर परिणाम होणे अगदी स्वाभाविक आणि शक्य आहे. परंतु ही तुलना अप्रस्तुत आहे.

खगोलातील ग्रहनक्षत्रांचे गुरूत्वाकर्षणाने अथवा भौतिकशास्त्रांच्या इतर सिद्धान्तानुसार मानवी जीवनावर काही परिणाम होत असतील, परंतु असे परिणाम जातकशास्त्रास आधारभूत नाहीत किंवा जातकशास्त्राचा विषय नाहीत हे लक्षात ठेवले पाहिजे. ग्रहनक्षत्रांचे गुरूत्वाकर्षणादी परिणाम एका ठिकाणच्या सर्व व्यक्तींवर सारखेच असावयास हवेत. असले परिणाम जातकशास्त्राचा विषय नाहीत. जातकशास्त्राचा मूलभूत सिद्धात असा की आकाशस्थ ग्रहनक्षत्रांचे मानवी जीवनावरील परिणाम हे विविध व्यक्तींवर विविध होतात आणि त्या व्यक्तींच्या जन्मकाळी आकाशस्थ ग्रहांची जो स्थिती त्यावर अवलंबून असतात. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर जातकशास्त्राचा मूलभूत सिद्धात असा की व्यक्तीच्या जन्मकाळी आकाशस्थ ग्रहांची जी स्थिती असेल तिने व्यक्तीच्या जीवनातील विविध अंगांचे यशापयश निश्चित होते. जातकशास्त्राच्या या सिद्धान्ताला आज तरी कोणत्याही भौतिकशास्त्राचा आधार नाही हे मान्य केले पाहिजे.

परंतु म्हणून फलज्योतिष हे एक थोतांड आहे, त्यात शास्त्रशुद्ध संशोधनाची गरज नाही असे म्हणणे युक्त होणार नाही. या प्रश्नास दुसरीही बाजू आहे. जातकशास्त्रास भौतिक शास्त्रांचा आधार नसला तरी पाश्चात्यपौर्वात्य सर्व देशात जातकाचा अभ्यास व व्यवसाय शतकानुशतके चालू आहे. दैनंदिन जीवनात चिकित्सक, बुध्दिवादी दिसणारी माणसेही जातकाचा अनुभव येतो म्हणून सांगतात. स्वतःस बुद्धिवादी म्हणवून जातकास थोतांड मानणारी मंडळीही लौकिक जीवनातील अपयशाने कुंठित झाली म्हणजे जातक पाहतात. ही वस्तुस्थिती जातकशास्त्रात शास्त्रशुद्ध संशोधन हाती घेण्यास पुरेसे कारण आहे. जातक थोतांड असेल तर ते शास्त्रमान्य पद्धतीने सिद्ध केले पाहिजे. जातकशास्त्र निव्वळ थोतांड असेल तर तसे सिद्ध करणे समाजहिताच्या दृष्टिने आवश्यक व अगत्याचे आहे.

परंतु शास्त्रशुद्ध संशोधन करावयाचे तर संशोधकाने आपले पूर्वग्रह बाजूस ठेवले पाहिजेत, आणि संशोधनातून जे शास्त्रशुद्ध निष्कर्ष निघतील ते निरहंकारी वृत्तीने स्वीकारले पाहिजेत. शास्त्रशुद्ध संशोधन हे दुधारी शस्त्र आहे. त्याने अमुक एकच सिद्ध होईल असे सांगता येत नाही. त्याचे निष्कर्ष शास्त्रबुद्धीने मानले पाहिजेत. समजा, या संशोधनातून जातकशास्त्रास शास्त्रमान्य अनुभवजन्य पुरावा उपलब्ध झाला तर केवळ अशा पुराव्यास आज भौतिक शास्त्राचा आधार नाही म्हणून तो त्याज्य मानता येणार नाही. त्याला भौतिकशास्त्रांचा आधार शोधून काढण्याची जबाबदारी भौतिकशास्त्रज्ञांची आहे. ते ती निर्विवादपणे स्वीकारतील याविषयी तिळमात्र संदेह नाही.

दुसरा पक्ष होराभूषण, होरारत्न व होरामार्तंडांचा. त्यांच्या मते या विषयात शास्त्रशुद्ध संशोधनाची गरज नाही. जातकशास्त्र हा विश्वासाचा प्रश्न आहे. ज्यांचा विश्वास असेल त्यांनी ते पहावे. ज्यांचा विश्वास नसेल, त्यांनी ते पाहू नये. लौकिक जीवनातील यशापयशाची कारणमिमांसा न

कळल्याने मन कुंठित झाले म्हणजे जातकनिदानाने समाधान लाभते. लौकिक यशांतून उद्भवणारा अहंकार कमी होतो. अपयशाने पराभूत झालेल्या मनाला दिलासा मिळतो. यात संशोधनाची कालवाकालव नको. ही व्यावसायिक व्यवहारदृष्टी झाली. त्यात शास्त्रबुद्धी नाही. अशाने शास्त्र प्रगत होत नाही. जातकशास्त्र अनुभवसिद्ध असेल तर ते विश्वासाचा वा निष्ठेचा विषय करण्याचे कारण नाही. संशोधनाचे निष्कर्ष काहीही निघोत, अनुभवजन्य पुरावा शास्त्रशुद्ध पद्धतीने तपासून घेणे हे समाजहिताचे दृष्टीने आवश्यक आहे. नवीन गणकयंत्रामुळे ते आता पुष्कळ सुलभही झाले आहे, तत्संबंधी प्राथमिक स्थूल विवेचन व दिग्दर्शन वर केले आहे. सर्व ज्योर्तिविदांनी आणि अभ्यासकांनी अशा संशोधनाचे स्वागत करून त्या कामी सहकार्य दिले पाहिजे. प्रस्तुत कुंडली-संग्रहाच्या प्रकाशनाने अशा संशोधनास प्रारंभ होईल अशी आशा आहे.

पुणे ४ **वि. म. दांडेकर**
दि. १५-२-७३